चित्रकला स्पर्धा 2011

मुलींचे शिक्षण आपणा सर्वांना कसे उपयोगी ठरेल ?

United Nation Girls Education Initiative (UNGEI) च्या सहकारी संस्था, यांच्यातर्फे शिक्षण क्षेत्रात लैंगिक समानतेचा प्रसार या विषयावर आयोजित केलेल्या तिस-या स्पर्धेसाठी आपल्याकडून प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

यावर्षी आपल्याकडून “मुलींचे शिक्षण आपणा सर्वांना कसे उपयोगी ठरेल” या संकल्पनेला अनुसरुन त्यावर चित्ररुपाने आपले विचार प्रकट करणारी चित्रे, रेखाटने मागविण्यात येत आहेत.

**बक्षिसे –**

- 13 विजेती चित्रे UNGEI च्या (लैंगिकता शिक्षण दिनदर्शिका – 2012) मध्ये प्रकाशित केली जातील. ही दिनदर्शिका एशिया-पॅसिफीक प्रदेशात वितरीत केली जाते.
- सर्व विजेत्यांना अधिकृत गुणवत्ता प्रमाणपत्र दिले जाईल.
- सर्व पुरस्कार प्राप्त चित्रांना संघटक संस्थांच्या वेबसाईटवर प्रसिद्धी दिली जाईल.
- याशिवाय पुरस्कार प्राप्त चित्रे तसेच स्पर्धेतील इतर प्रवेशिकांचा वापर सहभागी संस्थांच्या विविध प्रकाशने, सादरीकरणे, वेबसाईट तसेच निरनिराळ्या माध्यमातून केला जाईल.

**चित्रांसाठी निर्देश –**

आपण पाठविलेल्या चित्रातून “मुलींचे शिक्षण आपणा सर्वांना कसे उपयोगी ठरेल” हा संदेश अधोरेखित व्हायला हवा –

- आपले चित्र A4 या आकारात हवे.
- आपले चित्र रंगीत किंवा कृष्णधवल असू शकते
- चित्र काढण्यासाठी आपल्या आवडीनुसार आपण कोणतेही साधन वापरु शकता (उदा. खडू, पेन्सील, रंग, इ.)
- चित्रातून संदेश देताना आपण तो खालील प्रकारे दाखवू शकता –
  - खेळ व उपक्रम
  - घरातील घडामोडी
  - एकत्र खेळणे
  - शाळेतील वातावरण

**मालकी हक्क (Copyright) –**

सदर स्पर्धेसाठी आपण आपले चित्र पाठविल्यावर त्यावरचा मालकी हक्क सदर स्पर्धा आयोजक संस्था यांना बहाल करावा लागेल. तसेच सदर चित्र आयोजक संस्थेद्वारे त्यांच्या विविध प्रकाशने, सादरीकरणे, वेबसाईट वर वापरायचा झाल्यास चित्रकाराचे नांव, वय व देश यांचा उल्लेख करण्यात येईल. सदर वापराबाबत कोणताही मोबदला, सूचना अथवा परवानगी घेतली जाणार नाही.

**कोण सहभागी होऊ शकतो –**

- एशिया-पॅसिफीक प्रदेशात वास्तव्य करणा-या सर्व निवासींसाठी ही स्पर्धा खुली आहे.
- स्पर्धक 18 किंवा त्यापेक्षा कमी वयाचा असावा.
- मुले व मुलींना या स्पर्धेत भाग घेण्यासाठी उत्तेजन देण्यात येईल.

**प्रवेशिकांची संख्या –**

प्रत्येक स्पर्धक एक किंवा त्यापेक्षा जास्त चित्रे पाठवू शकतात.

**प्रवेशिका कशी पाठवाल ?**

सोबत दिलेला वैयक्तिक माहिती प्रपत्र भरावे व आपण पाठवित असलेल्या प्रवेशिकेच्या (चित्राच्या)

मागील बाजूस आपले नांव, वय, लिंग व देश यांचा उल्लेख करावा.

आपण प्रवेशिका पाठविल्यावर आयोजक संस्थांच्या विविध प्रकाशने, संकेतस्थळे यावर आपले नांव, वय, लिंग व देश यांचा वापर करण्याची ती अनुमती समजली जाईल. याव्यतिरिक्त कोणतीही ओळख देणारी माहिती प्रकाशित केली जाणार नाही.

आपली चित्रे आपण कागदावर किंवा संगणकीय माध्यमातून पाठवू शकता.

कृपया आपल्या प्रवेशिका खालील पत्त्यावर पाठवाव्यात –

**श्रीम. हुमा मसूद**
UNESCO भारतीय कार्यालय,
बी 5 / 29 सफदरजंग एन्क्लेव्ह,
नवी दिल्ली, 110029 (भारत)

तसेच याबाबतची सुचना खालील पत्त्यावर पाठवावी –

Mr. Umesh Kumar Gupta,
Advocacy Coordinator,
National Coalition for Education (NCE),
Shikshak Bhavan,
41 Institutional Area, Pankha Road, Janakpuri,
New Delhi 110058

Phone- 011 2852 6851 mob: 9212089894

किंवा h.masood@unesco.org किंवा info@nceindia.org या पत्त्यावर ई मेल करा

(संगणकीय माध्यमातून आपली प्रवेशिका पाठविताना ती TIFF, EPS किंवा JPEG मध्ये असावी. तसेच तिचे रिझॉल्युशन 300 DPI चे असावे)

प्रवेशिका पाठविण्याची मुदत –
प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख – दि. 1 जून 2011

**निवड पद्धती –**

सर्व प्रवेशिकांना दुहेरी फेरीतून निवड फेरीत जावे लागेल.

1) प्रथम फेरीत UNGEI चे आयोजक निवड करतील.
2) दुस-या फेरीतून इंटरनेटद्वारे मतदान पद्धतीने निवड केली जाईल व ती जनमताने केली जाईल.

विजेत्या चित्रांची घोषणा नोव्हेंबर 2011 मध्ये करण्यात येईल.

# चित्रकला स्पर्धा 2011

**विषय - मुलींचे शिक्षण आपणा सर्वांना कसे उपयोगी ठरेल ?**

- नोंदणी प्रपत्र -

प्रत्येक प्रवेशिकेसाठी वेगळे प्रपत्र भरावे (फक्त इंग्रजीतून)

नांव -
आडनांव -
वय -
वर्ग (श्रेणी / जात)
लिंग -
शाळेचे नांव - (पत्ता व पिनकोडसह)
देश -
पत्रव्यवहाराचा पत्ता -
इ-मेल पत्ता -

आपण प्रवेशिका पाठविल्यावर आपले नांव, वय, लिंग व देश यांचा वापर करण्याची ती अनुमती समजली जाईल. याव्यतिरिक्त कोणतीही ओळख देणारी माहिती वापरली जाणार नाही.

बालकाची सही ................................

शिक्षकाची सही ................................

UNGEI आणि जागतिक शिक्षण अभियान यांचा - Big Story Lesson
जागतिक कृती आठवडा - 2011 : जो हक्क आहे, तो हक्क बनवा. शिक्षण - आता मुली व स्त्रीयांसाठी

पूर्व एशिया पॅसिफिक प्रदेश - संयुक्त राष्ट्र मुलींचे शिक्षण उपक्रम (EAP UNGEI) मधील सहभागी संस्था व जागतिक शिक्षण अभियान यांच्या सहकार्याने आपल्या शाळेस दि. 2 ते 8 मे 2011 दरम्यान The Big Story Lesson मध्ये सक्रिय सहभागी होण्यासाठी निमंत्रित करण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये जगभरातील सुमारे 100 देश, लक्षावधी मुले व प्रोढ व्यक्ती सहभागी होणार आहेत. प्रेरणादायी स्त्रीया व मुलींच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ऐकण्यासाठी, जो प्रवास त्यांनी त्यांच्या शाळेपासून सुरु केला व ज्या प्रवासात त्यांनी आलेल्या संकटांना धैर्याने तोंड दिले. आपली शाळा या महत्त्वाच्या कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होईल आणि हा कार्यक्रम शैक्षणिक तसेच मनोरंजनात्मक होईल अशी आम्ही आशा करतो.

Big Story Lesson हा उपक्रम स्त्रीया आणि मुलींच्या आयुष्यात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा असेल. आज अनेक स्त्रीया व मुली शाळेपासून वंचित राहील्यामुळे लिहू व वाचू शकत नाहीत. त्यातल्या काहीजणी शाळेत गेल्याही, परंतु पैशांच्या अभावी त्यांना शाळा सोडावी लागली. अनेक नेत्यांनी स्त्रीया व मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी अनुकुल तरतूद करण्याचे वचन दिलेय आणि ते 2011 या सालात प्रत्यक्षात उतरेल अशी आपण अपेक्षा करु या.

आपल्या शाळेतील शिक्षकांना आणि मुलांना त्यांच्यासारख्याच करोडो लोकांच्या साथीने या जागतिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळत आहे. UNGEI मधील सहभागी संस्थांच्या मदतीने, या कार्यक्रमाच्या अनुभवाची देवाणघेवाण, विशेष करुन यातून आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेमधून, जागतिक पातळीवर होणार आहे. या कार्यक्रमाच्या शेवटी आपला सहभाग इंटरनेटवरुन निश्चित करुन घ्यावा जेणेकरुन आपली शाळेचीही नोंद जगातील अन्य करोडो शाळांच्या बरोबरीने घेतली जाईल.

आपणांस The Big Lesson या कार्यक्रमात सहभाग घेण्यास मदत व्हावी म्हणून आम्ही काही माहिती येथे देत आहोत -

- The Big Story Lesson या कार्यक्रमाची रुपरेषा
- चित्रकला उपक्रमासाठी सूचना

मुली आणि महिलांना शिक्षणाची संधी प्राप्त करुन देण्याच्या उदात्त हेतुने आपण या उपक्रमात सक्रीयपणे सहभागी व्हाल अशी अपेक्षा करतो.

आपला स्नेहांकित,

जागतिक कृती आठवडा - 2011 : Big Story Lesson Plan
जो हक्क आहे, तो हक्क बनवा. शिक्षण - आता मुली व स्त्रीयांसाठी

**उद्दिष्ट्ये -**

1. जगातील करोडो मुले आणि लोकांना शाळेत जायला मिळत नाही आणि यातील बहुतांश स्त्रीया आणि मुली आहेत, या वस्तुस्थितीची जाणीव करुन देणे.
2. विद्यार्थ्यांनी जगाला लिंगभेद समस्येच्या दृष्टीकोनातून पाहण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करणे व त्याबाबत जाणीवजागृती करणे.
3. शिक्षणाबाबत अनेक नेत्यांनी दिलेल्या आश्वासनाची चर्चा करणे व ते त्यांनी अद्याप पूर्ण न केल्याची जाणीव करुन देणे.
4. विद्यार्थी या जागतिक प्रयत्नाद्वारे जनजागृतीचा संदेश कशाप्रकारे प्रसारित करतात याचे प्रत्यक्षिक दाखविणे.

या उपक्रमाच्या शेवटी काय शिकावे ?

- मुलींना सुशिक्षित करण्यामागचे फायदे समजणे.
- जगातल्या निरनिराळ्या भागातल्या विद्यार्थ्यांच्या जगण्याच्या विविध पद्धती समजून घेणे.
- मुलींना शाळेत आणण्यास सहाय्य करणा-या तसेच त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणा-या अडथळ्यांचा अभ्यास करणे.

भाग - अ

**विभाग - 1 - प्रस्तावना (5 मिनिटे)**

शिक्षकांनी खुलासा करायचा की जगभरातील मुलांनी अनेक प्रमुख महिलांसह Big Story Lesson या उपक्रमात सहभाग घेऊन ज्या लाखो मुलींना आणि महिलांना शिक्षणापासून वंचित केले आहे, त्यांना पाठींबा दर्शविला आहे.

शिक्षकांनी वर्गात प्रश्न करायचा, की तुम्ही किती अशिक्षित लोकांना ओळखता तसेच अशांमध्ये मुली व स्त्रियांची संख्या किती.

शिक्षकांनी खालील बाबींची उहापोह करायचा आहे -

- आज जगातील 72 दशलक्षाहून अधिक मुले शाळेबाहेर (शिक्षणापासून वंचित) आहेत.
- त्यापैकी 54 टक्के (अंदाजे 39 दशलक्ष) मुली आहेत; आणि
- निरक्षर नागरिकांपैकी दोन तृतियांश या महिला आहेत.

निरक्षर मुलगी खालील कारणास्तव शिक्षणाबाहेर राहते -

- लवकर लग्न झालयामुळे.
- कुपोषित झाल्यामुळे किंवा आजार झाल्यामुळे.
- गरीब असल्यामुळे.

आपण अशा एखाद्या महिलेला ओळखता का, जिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे ? ती महीला शाळेत गेली होती का ?

## विभाग - 2 - लिंगभेदाची समस्या आणि शिक्षण

शिक्षकांनी वर्गात प्रश्न विचारायचा की त्यांनी मुली व मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम करणारे घटक आपण ओळखले आहेत का ? आणि असे घटक मुले व मुलींच्या शिक्षणात वेगवेगळ्या रितीने विपरित परिणाम करतात का ?

विकसनशील देशात स्त्रीयांसाठी शिक्षणाच्या संधी याबाबतही शिक्षकांनी प्रश्न विचारायचा.

(याकरिता शिक्षणाच्या मुलभूत हक्कातील विविध परिषदांचा उहापोह करणे)

- बालहक्क परिषद जी 1989 मध्ये अंगिकारली गेली आणि जी जागतिक स्तरावर कायदेशीरपणे सर्व मानवी हक्कात आंतर्भूत आहे.
- हा एक मुलभूत हक्क आहे जो त्यांची स्थिती, धर्म, जात याचा विचार न करता सगळीकडे प्रदान करण्यात आला आहे. यामध्ये जगण्याचा हक्क, पूर्णपणे विकसित होण्याचा हक्क, धोक्यापासून सुरक्षेचा हक्क, दुरुपयोग किंवा पिळवणूकीपासून संरक्षणाचा हक्क तसेच पारिवारीक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकास तसेच अस्तित्वाचा हक्क आदींचा समावेश होतो. तसेच भेदभावविरहीत, अस्तित्व आणि विकास, विचारांचा सन्मान व मुलांच्या सर्वोच्च हिताला प्राधान्य ही चार मूलतत्वे यात निर्देशित केली आहेत.
- या परिषदेचे स्वरुप आता विश्वव्यापी झाले असून त्यास 194 देशांनी त्यास समर्थन दिले आहे.
- या कराराचा स्विकार करुन या देशांच्या राष्ट्रीय सरकारांनी मुलांचे संरक्षण व त्यांच्या हक्कासाठी अधिक सजग होण्यासाठी एकमत केले आहे आणि यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायापुढे ही जबाबदारी स्विकारली आहे.

शिक्षकांनी कमी विकसित देशांचा इतिहास, तेथील भूगोल, वेगवेगळ्या संस्कृती आणि राहणीमान याबद्दलही चर्चा घडवून आणायची आहे.

स्त्रिया आणि पुरुष यांच्यासाठी समान शैक्षणिक संधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय केले जाऊ शकते ?

अशा काही कामांची नावे सांगा, की जे फक्त पुरुष करु शकतात किंवा स्त्रीयाच करु शकतात.

विद्यार्थ्यांना घरामध्ये कोणती कामे करावी लागतात. व अशी कामे करणे तुम्हाला योग्य वाटते का या बद्दल चर्चा करणे.

घरातले काम असल्यामुळे आम्ही शाळेला जाऊ शकत नाही, असे जेव्हा तुमचे पालक म्हणतील, तेव्हा तुम्हांस कसे वाटेल ?

शिक्षण हे का महत्त्वाचे आहे, आणि विशेषतः मुली त्यापासून का वंचित राहतात याची कारणे द्या -

याबाबत खालील प्रतिक्रिया असू शकतात -

- काही मुले संघर्ष तसेच आपद्ग्रस्त क्षेत्रात राहतात.
- काही संस्कृतींमध्ये मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही.
- लहान वयात लग्न करावयाचे असल्यामुळे व घरची जबाबदारी सांभाळायची असल्यामुळे काही मुलींना शाळा सोडण्यासाठी सक्ती केली जाते.
- मुली शाळेपासून दूर वास्तव्य करतात तसेच शाळेत पोहोचताना त्यांची छळवणूक होऊ शकते या धोक्यापोटी त्या शाळा सोडतात.
- गरीबी - आपल्या परिवाराच्या मिळकतीत भर घालण्याच्या दृष्टीने बालमजूरी करावी लागते.
- पुस्तके आणि गणवेश विकत घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात.
- शाळेचे शुल्क (फी) भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात.
- शाळांची संख्या इतकी कमी आहे की सगळ्यांना प्रवेश मिळू शकत नाही.
- शिक्षकांची संख्या कमी आहे.

**विभाग - 3 - याबाबत काय केले जाऊ शकते.** (10 मिनिटे)

मुलींना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी तुमच्या मते काय केले जाऊ शकते ? या प्रश्नावर खालील उत्तरे मिळू शकतात.

- विकसनशील देशामध्ये मुलींच्या शिक्षणासाठी सरकारी समर्थन वाढविले पाहिजे.
- मुलींसाठी स्वच्छतेच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.
- मुलींना दुय्यम लेखणा-या बाबींचे उच्चाटन करणे.
- शैक्षणिक शुल्क आणि छुपे शुल्क बंद करण्यात यावे.
- मुलींच्या शिक्षणाचे समर्थन करण्यासाठी पुरुष व मुलांना प्रोत्साहित करण्यात यावे.

शिक्षकांनी संपूर्ण वर्गाला खालील प्रश्न विचारायचे आहेत. तसेच तिथे जर एखादा राजकीय नेता असेल तर त्याच्याकडूनही उत्तर मागायचे आहे -

- संपूर्ण जगातील किती मुले शाळेबाहेर आहेत.
- जेव्हा शिक्षणाचा प्रश्न येतो, तेव्हा कोणता समुह त्यापासून जास्त वंचित असतो.
- सुशिक्षित असलेली एखादी प्रसिद्ध महिला.
- शिक्षण का महत्त्वाचे आहे यामागची कारणे.

**विभाग - 4 - उपक्रम.** (30 मिनिटे)

मुलींनी शिक्षण का घ्यावयाचे आहे यामागील कारणांचा विचार करण्यासाठी शिक्षकांनी प्रवृत्त करावयाचे आहे. चित्र किंवा रेखाटन काढून या “मुलींचे शिक्षण आपणा सर्वांना कसे उपयोगी ठरेल ?” या प्रश्नाबाबत प्रतिसाद मागवायचा आहे.

यावरील सविस्तर सुचनांसाठी सोबत जोडलेले प्रपत्र पहावे. ही स्पर्धा ऐच्छिक आहे. तसेच या स्पर्धेमध्ये भाग न घेताही आपण हा उपक्रम करु शकता (शाळा चित्रे आपल्याकडे ठेवू शकतात)

यातील प्रतिक्रियांमध्ये खालील उदाहरणे येऊ शकतात.

- सुशिक्षित मुलगी मोठी होऊन एक सुशिक्षित स्त्री बनते आणि संभवतः आर्थिदृष्ट्या अधिक सक्षम होते तसेच तिची मुले शाळेत जाण्याची जास्त संभावना असते.
- सुशिक्षित स्त्री स्वतःची आणि आपल्या मुलांच्या आरोग्याची काळजी जास्त योग्य रितीने घेऊ शकते.
- बालविवाह टाळले जाऊ शकतात आणि एड्स सारख्या भयानक रोगांचा प्रादूर्भावही कमी होतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कल्पना करावयास सांगणे की जर मुली शाळेतच गेल्या नसत्या तर काय झाले असते ?

- शिक्षक 2-3 मुलांना शिक्षण नसल्याचे तोटे स्पष्ट करावयास सांगतात.

शिक्षक मुलींना शिक्षित करण्यामागचे फायदे उदाहरणासह सर्वांना समजावून सांगतात. त्यातील काही उदाहरणे खालील प्रकारे असू शकतात -

- सुशिक्षित लोक अधिक निरोगी राहतात. कारण निरोगी राहण्यासाठीची माहीती त्यांना उपलब्ध असते व आपल्या निरोगी जीवनासाठी ते योग्य निवड करतात.
- भुकेचा प्रतिकार शिक्षणाने करता येतो. एका सुशिक्षित आईचे मुल आरोग्याच्या दृष्टीने सुदृढ असण्याची शक्यता जास्त असते.
- शिक्षण जीवनाचे रक्षण करते. एका सुशिक्षित आईचे मुल 5 वर्षापेक्षा अधिक जगण्याची जास्त संभावना असते.
- शिक्षणामुळे दारिद्र्य नष्ट होते.

शिक्षक विचारतात की, सर्वच मुलींना व महिलांना शिक्षण प्राप्त करण्याची संधी मिळत नाही. हे बरोबर आहे का ?